उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव संलग्नीत

श्रद्धा ! शिक्षण !!

श्री साईबाबा भक्त मंडळ, म्हसावद संचलित,

# कला वरिष्ठ महाविद्यालय, म्हसावद

ता. शहादा, जि. नंदुरबार, ४२५४३२, महाराष्ट्र

दूरध्वनी (०२५६५) २५५४८६, मो. ९५०३२३७३०९, ९९२१०३४३७८

Email : saibabaarts@rediffmail.com

स्थापना : शासन आदेश एन.जी.सी.२००७ (१८९/०७)

माशि-३, दि.०२/०७/२००७

**कला शाखा - पदवी वर्गासाठी**

# माहिती पत्रक

सन २०१   - २०१



## :: विद्यापीठाचे ध्येय ::

समाज घटकांच्या सशक्त सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी मार्गदर्शक दीप बनून सर्वसामान्यांमध्ये ज्ञानाचा प्रसार करणे, तद्वतच जागरूक संशोधक, तंत्रज्ञ, कुशल व्यावसायिक आणि नागरिक घडविण्यासाठी विद्यार्थ्यांना उपयुक्त दर्जेदार शिक्षण प्रदान करणे.

## :: विद्यापीठ गीत ::

मंत्र असो हा एकच हृदयी "जीवन म्हणजे ज्ञान" ।
ज्ञानामधूनी मिळो मुक्ती अन् मुक्तिमधूनी ज्ञान ।। धृ ।।

कला, ज्ञान, विज्ञान, संस्कृती साधू पुरुषार्थ
साफल्यास्तव सदा अंतरी पेटवू ज्ञानज्योत
मंगल पावन चराचरातून स्त्रवते अक्षयगान ।। १ ।।

उत्तम विद्या परम शक्ती ही अमुची ध्येयासक्ती
शील, एकता, चारित्र्यावर सदैव अमुची भक्ती
सत्य शिवाचे मंदिर सुंदर विद्यापीठ महान ।। २ ।।

समता, ममता, स्वातंत्र्याचे नांदो जगी नाते
आत्मबलाने होऊ आम्ही अमुचे भाग्यविधाते
ज्ञानप्रभुची लाभो करुणा आणि पसायदान ।। ३ ।।

## उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## :: विद्यार्थी सुविधा केंद्र ::

**पु.सा.गु.वि.प्र.मंडळाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शहादा**

**संपर्क क्र. ०२५६५-२२९५७६**

वेळ : सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:४० पर्यंत

(सुटीचे दिवस व पहिला आणि तिसरा शनिवार वगळता)

श्री साईबाबा भक्त मंडळ, म्हसावद संचलित,

# कला वरिष्ठ महाविद्यालय, म्हसावद

ता. शहादा, जि. नंदुरबार, पीन-४२५४३२, महाराष्ट्र

श्री साईबाबा भक्त मंडळ, म्हसावद ही संस्था शहादा तालुक्यातील एक अग्रगण्य शिक्षण संस्था म्हणून सुपरिचित आहे. आमच्या शिक्षण संस्थेने ग्रामीण, गरजू, आदिवासी गरीब, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक शिक्षणापासून ते माध्यमिक, उच्च माध्यमिक विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, डी.टी.एड., विद्यालयापर्यंत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन दिली. १२वी नंतर दारिद्रय रेषेखालील गरीब, आदिवासी, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना इतर ठिकाणी उच्च शिक्षणासाठी जाणे आर्थिक दृष्ट्या न परवडणारे असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ लागली, विद्यार्थ्यांची होणारी ही गैरसोय संस्थेने लक्षात घेऊन २007 साली कला वरिष्ठ महाविद्यालयाची स्थापना करुन ग्रामीण, गरीब आदिवासी, मागासवर्गीय विद्यार्थी युवक-युवतींना उच्च शिक्षणाची सुविधा व संधी उपलब्ध करुन दिली.

**आमचे ध्येय :**

आमच्या श्री साईबाबा भक्त मंडळ संचलित कला वरिष्ठ महाविद्यालयाच्या माध्यमाने विद्यार्थ्यांभिमुख विविध उपक्रम राबविणे, या परिसरात ग्रामीण, आदिवासी, गरीब, मागासवर्गीय विद्यार्थी, युवक-युवती, स्त्री-पुरुष यांचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रयत्न करणे, योग्य शैक्षणिक वातावरण व परिस्थिती निर्माण करुन उच्च शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे, तसेच विविध उपक्रमांद्वारे संतांची शिकवण रुजविणे, सामाजिक जाणीव जागृती निर्माण करुन परस्पर सामाजिक सद्भाव, प्रेम, समता, स्वातंत्र्य व बंधूभाव रुजविणे, ग्रामीण, गरीब, आदिवासी, मागासवर्गीय व सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सुविधा व संधी उपलब्ध करुन त्यांचे जीवनमान उंचावणे, त्यांचा सर्वांगीण विकास करणे हे महाविद्यालयाचे मुख्य ध्येय असून महाविद्यालयामार्फत ते पूर्ण करण्यासाठी अखंड प्रयत्नरत राहणे.

**आमची उद्दिष्टये :**

१) संतांची शिकवण रुजविणे व संतांच्या शिकवणुकीतून विद्यार्थ्यांमध्ये प्रेम, भूतदया, अहिंसा इ. मुल्यांची रुजवणूक करुन सामाजिक जाणीव जागृती निर्माण करणे.

२) विद्यार्थ्यांमध्ये आज्ञाधारकपणा, शिस्त-स्वयंशिस्त, जिज्ञासा, स्वावलंबन व गुणवत्ता यात वाढ करणे.

३) विद्यार्थ्यांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, आध्यात्मिक, शैक्षणिक व सर्वांगीण

विकासासाठी प्रेरक म्हणून कार्य करणे.

४) ग्रामीण, गोर-गरीब, आदिवासी मागासवर्गीय व अशा सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणे व त्यांचे जीवनमान उंचावणेसाठी प्रयत्नरत राहणे.

५) सर्वांना समान उच्च शिक्षणाची सुविधा व संधी उपलब्ध करुन देणे.

श्री साईबाबा भक्त मंडळ, म्हसावद संचलित,

# कला वरिष्ठ महाविद्यालय, म्हसावद

ता. शहादा, जि. नंदुरबार, पीन-४२५४३२, महाराष्ट्र

श्री साईबाबा भक्त मंडळ, म्हसावद संचलित कला वरिष्ठ महाविद्यालय, म्हसावद हे म्हसावद व परिसरातील उच्च शिक्षणाचा प्रसार व प्रचार करणारी शिक्षण संस्था म्हणून सुपरिचित आहे. या महाविद्यालयाची स्थापना २००७ मध्ये संस्थापक अध्यक्ष कै.डॉ.दादासाहेब सुभाषजी सदारामजी बंब व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली. तद्नंतर माजी अध्यक्ष श्री.काशिनाथ गोपाळ चौधरी यांच्या नेतृत्वात महाविद्यालयाची वाटचाल सुरु झाली. तेव्हापासून महाविद्यालय दिवसेंदिवस प्रगतीपथाकडे वाटचाल करीत आहे. अशा या शैक्षणिक संस्थेच्या स्थानिक कार्यकारी मंडळाचे विद्यमान अध्यक्ष आदरणीय आप्पासो. श्री.विठ्ठल हिरजी चौधरी, उपाध्यक्ष आदरणीय आण्णासो.धारुभाई सदाशिव पाटील, सचिव आदरणीय आप्पासो.श्री. गणेश नरोत्तम पाटील व मंडळातील सर्व सन्माननीय सदस्य यांच्या समर्थ नेतृत्त्वाखाली या संस्थेची वाटचाल सुरु आहे.

या संस्थेत पदवी पर्यंत शिक्षणाची सोय व संधी उपलब्ध आहे.

## :: महाविद्यालयाची वैशिष्ट्ये ::

### प्रशस्त व सुसज्ज इमारत :

निसर्गरम्य वातावरणात महाविद्यालयाची अत्यंत सुंदर व सुसज्ज अशी इमारत असून सभोवतालचा परिसर व वातावरण अत्यंत आल्हाददायक आहे. सुसज्ज खोल्या, प्राचार्यदालन, कार्यालय, प्राध्यापक कक्ष, स्वतंत्र महिला व विद्यार्थिनी कक्ष, स्वतंत्र एन.एस.एस.कक्ष अशा सुविधांनी युक्त अशी ही महाविद्यालयाची प्रशस्त इमारत सज्ज आहे.

### ग्रंथालय :

महाविद्यालयाच्या ग्रंथालयात प्रत्येक विषयाची पाठ्यपुस्तके, संशोधन व संदर्भ ग्रंथ, स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक व महत्वाची पुस्तके अवांतर वाचनासाठी विविध विषयांवरील पुस्तक उपलब्ध आहेत. तसेच ज्ञान संवर्धनासाठी विविध विषयांवरील उत्कृष्ट नियतकालिके

संशोधनपर नियतकालिके आणि दर्जेदार साप्ताहिक व मासिके तसेच विविध वर्तमानपत्रे वाचनासाठी उपलब्ध आहेत.

## अभ्यासिका :

ग्रंथालयास जोडून अभ्यासिकेची उत्तम सोय करण्यात आलेली आहे. सवडीच्या वेळी किंवा तास संपल्यानंतर विद्यार्थ्यांना तेथे बसून अभ्यास करता येतो. परिक्षेच्या दृष्टिने अभ्यास, स्पर्धा परिक्षांची तयारी किंवा संदर्भ ग्रंथांचे अवलोकन यासाठी विविध मासिके, साप्ताहिक व सवर्तमानपत्रे पुरविण्यात येतात.

## पुस्तक पेढी योजना :

गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी लवकरच पुस्तक पेढी योजना सुरु करण्याच्या दिशेने वाटचाल सुरु आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तकांचे / पाठ्यपुस्तकांचे संच देण्याची सोय केली जाईल.

## ई-सुविधा :

उत्तम महाराष्ट्र विद्यापीठ जळगांवच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी इ. सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : Student Helpline No. (0257) 2258418
Email : sfc@nmuj.digitaluniversity.ac

## प्रशस्त क्रीडांगण :

विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाच्या आवारात प्रशस्त असे क्रिडांगण असून विविध खेळांच्या सरावासाठी हे क्रिडांगण विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिले जाते.

## शारीरिक शिक्षण व खेळ :

महाविद्यालयात शारिरीक शिक्षण व खेळ याबाबतीतही विशेष दक्षता घेतली जाते. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर तज्ज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विविध खेळांसाठी मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी विविध खेळांच्या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांकडून सराव करुन घेतला जातो.

## विद्यार्थी तक्रार निवारण मंच :

याद्वारे विद्यार्थ्यांच्या अडीअडचणींचे, तक्रारींचे निराकरण विना विलंबाने करण्यात येते.

## राष्ट्रीय सेवा योजना (NSS) :

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून ही योजना सुरु करण्यासाठी उ.म.विद्यापिठाकडून मान्यता मिळाली आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन, समता, बंधुता, सामजिक सलोखा, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय वृत्ती इ. गुणांचा विकास होईल.

**सांस्कृतिक मंडळ :**

पाठ्यक्रमांच्या अभ्यासाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कला गुणांचा व व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने महाविद्यालयात सांस्कृतिक आणि कला गुणांच्या विकासाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच वक्तृत्व स्पर्धा, निबंध लेखन, व्याख्याने, शैक्षणिक सहली असे विविध कार्यक्रम प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले जातात.

**प्राध्यापक वर्ग :**

महाविद्यालयाचे प्राध्यापक उच्च शैक्षणिक पात्रता धारक, अनुभवी, कार्यक्षम, आपल्या विषयात निष्णात व विद्यार्थी वर्गाबद्दल आस्था बाळगणारे आहेत. प्राध्यापकांकडून विद्यार्थ्यांना अध्यापन व्यतिरिक्त वेळोवेळी आवश्यक ते मार्गदर्शन केले जाते.

**बक्षिसे :**

तृतीय वर्षाच्या वार्षिक परिक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या पहिल्या ३ विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे व प्रमाणपत्रे दिली जातात.

**रेडरिबन क्लब (RRC) :**

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभाग व विद्यापीठाच्या निर्देशानुसार महाविद्यालयात रेड रिबन क्लबची स्थापना करण्यात आली आहे. ज्यामुळे HIV-AIDS बाबत विद्यार्थ्यांमध्ये व समाजामध्ये AIDS बाबत जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयातर्फे AIDS जनजागृती पर विविध कार्यक्रम राबविले जातात.

**विद्यार्थी परिषद :**

महाविद्यालयात विद्यापीठाच्या नियम व निर्देशाप्रमाणे विद्यापीठ प्रतिनिधी व वर्ग प्रतिनिधींची निवड केली जाते व त्या परिपत्रकाच्या आधारे विद्यार्थी परिषद गठीत केली जाते.

**युवतीसभा :**

महाविद्यालयीन विद्यार्थीनींचे विविध प्रश्न, समस्या, जाणून घेऊन त्या सोडविण्याच्या दिशेने या मंडळातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येतात. विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींची व्याख्याने आयोजित केली जातात.

## : महाविद्यालयात प्रवेशाचे नियम व अटी :

महाराष्ट्र राज्य पुणेच्या उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची १२ वी ची परिक्षा उत्तीर्ण होऊन महाविद्यालयात प्रथम वर्षासाठी (F.Y.B.A.) प्रवेश होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी पुढीलप्रमाणे

कागदपत्रे सादर करावीत.

१) महाविद्यालयाचा छापील नमुन्यातील प्रवेश अर्ज अचूक माहितीसह भरावा.

| | | |
|---|---|---|
| २) | इ. १० वी व १२ वी ची मूळ गुणपत्रके | २ सत्यप्रतींसह आवश्यक |
| ३) | मुळ L.C. | २ सत्यप्रतींसह आवश्यक |
| ४) | जातीचा दाखला (SC & ST) | २ सत्यप्रतींसह आवश्यक |
| | नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (OBC, NT, SBC) | २ सत्यप्रतींसह आवश्यक |
| ५) | मुळ उत्पनाचा दाखला (सर्व स्कॉलरशीप धारकांसाठी) | २ सत्यप्रतींसह आवश्यक |
| ६) | आधारकार्ड (बँक लिकींगसह) आवश्यक | २ सत्यप्रतींसह आवश्यक |
| ७) | मतदान कार्ड आवश्यक | २ सत्यप्रतींसह आवश्यक |

८) प्रवेश घेतांना भरावयाचे आवश्यक शुल्क (फी) आवश्यक (फी विहीत तक्त्यानुसार)

९) प्रथम वर्षात (F.Y.B.A.) नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून पात्रता करुन घेणे अनिवार्य.

१०) सवलतीत प्रवेश घेणाऱ्या मागसवर्गीय विद्यार्थ्यांनी भारत सरकार शिष्यवृत्ती अर्ज करणे अनिवार्य आहे. अन्यथा संपूर्ण फी भरावी लागेल.

११) डी.एड्.उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी स्थलांतर (मायग्रेशन) मुळ प्रमाणपत्र व दोन सत्य प्रतींसह आवश्यक

## : विद्यार्थ्यांसाठी आचारसंहिता (नियमावली) :

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

१) विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित झाल्यानंतर त्याला महाविद्यालयाकडून ओळखपत्र दिले जाईल. प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र सदैव जवळ बाळगले पाहिजे, मागणी केल्यानंतर ते दाखविले पाहिजे. ओळखपत्राशिवाय ग्रंथालयाचा अगर वर्गातील व्याख्यानाचा लाभ घेता येणार नाही. ओळखपत्र कार्यालयातून रु.२५/- शुल्क भरुन मिळेल. हरवल्यास अतिरिक्त शुल्क (फी) भरावे लागेल.

२) वेळापत्रकाप्रमाणे विद्यार्थ्यांनी सर्व विषयांच्या तासिकांना उपस्थित राहणे आवश्यक राहील.

३) प्रत्येक विद्यार्थ्यांची हजेरी ८०% असणे आवश्यक राहील. अन्यथा परिक्षा फॉर्म व शिष्यवृत्ती अर्ज भरता येणार नाही.

४) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा महाविद्यालयाबाहेर गैरवर्तन केल्यास त्याला महाविद्यालय सोडावे लागेल. या संबंधी अंतीम निर्णय घेण्याचा अधिकार मा.प्राचार्यांचा आहे.

५) विद्यार्थ्यांनी वैद्यकिय तपासणी करुन घेणे आवश्यक राहील. त्याशिवाय विद्यार्थ्यांचा परिक्षा फॉर्म विद्यापीठाकडे पाठविला जाणार नाही. (FYBA-विद्यार्थ्यांना वैद्यकीय तपासणी आवश्यक)

६) महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थी-विद्यार्थीनीला शिस्त व नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

७) विद्यार्थी-विद्यार्थीनींनी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व कर्मचाऱ्यांशी सौजन्याने वागले पाहिजे.

८) महाविद्यालयाने नेमून दिलेला पोशाख (ड्रेस कोड) वापरणे विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.

९) महाविद्यालयाच्या आवारात गुटखा, तंबाखू खाण्यास व धुम्रपान करण्यास सक्त मनाई आहे. तसे आढळल्यास दंडात्मक कार्यवाही केली जाईल.

१०) महाविद्यालयात मोबाईल वापरण्यास राज्य शाससनाच्या निर्देशानुसार बंदी आहे.

११) महाविद्यालयाकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सुचनांचे विद्यार्थ्यांनी काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

१२) संपूर्ण वर्षभरत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या वर्गांना नियमित हजर राहिले पाहिजे. प्राचार्यांच्या परवानगीशिवाय गैरहजर राहता येणार नाही. अनियमित विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज विद्यापीठाकडून तसेच शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज नामंजूर झाल्यास त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

१३) कोणत्याही विद्यार्थ्यास प्रक्षोभक व हिंसक अशा जातीय, भाषीय व राजकीय वळवळीत भाग घेता येणार नाही.

१४) विद्यार्थ्याने महाविद्यालयाशी संबंधीत असलेली कोणतीही माहिती वृत्तपत्रांमध्ये मा.प्राचार्यांच्या पूर्व परवानगीशिवाय देता कामा नये.

१५) मा.प्राचार्यांच्या पूर्व परवानगीशिवाय कोणतेही मंडळ स्थापन करु नये. तसेच कोणत्याही व्यक्तीस वक्ता व सभाध्यक्ष म्हणून निमंत्रण देवू नये, परस्पर वर्गात जाऊन सुचना देणेस बंदी आहे.

१६) महाविद्यालयाच्या मालकीच्या कोणत्याही वस्तुची नासधुस/नुकसान होणार नाही याची विद्यार्थ्यांनी काळजी घेतली पाहिजे. दोषी विद्यार्थ्यांवर दंडात्मक कार्यवाही केली जाईल.

१७) महाविद्यालयामार्फत आयोजित विविध कार्यक्रमांना उपस्थित राहणे विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.

१८) आपले महाविद्यालय वर्ग व महाविद्यालयाचे आवार स्वच्छ व नीटनेटके ठेवणे विद्यार्थ्यांचे कर्तव्य आहे.

१९) महाविद्यालयात, वर्गात, आवारात व बाहेर विद्यार्थ्यांची वागणूक शालीनतेची, विनयाची व सहकार्याची असली पाहिजे.

२०) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात/वर्गात आपल्या वर्तनाने कुठल्याही प्रकारचा उपद्रव होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे.

२१) महाविद्यालयात, आवारात, गटबाजी करणे, भांडण करणे, विद्यार्थीनींची छेड काढणे, वाचनालयाचे नुकसान करणे, पुस्तके फाडणे, कर्मचाऱ्यांशी अरेरावीने वागणे, कार्यालयीन व महाविद्यालयीन कामात व्यत्यय आणणे तसेच वरील नियमांचे पालन न करणे हा कायदेशीर गुन्हा समजून कठोर कार्यवाही करण्यात येईल.

२२) ज्या बाबींचा समावेश वरील नियमांमध्ये करण्यात आला नाही त्या बाबतीत अंतीम निर्णय घेण्याचा अधिकार मा. प्राचार्य यांना आहे.

## : रॅगींग संबंधी महत्त्वाची सुचना :

महाविद्यालयामध्ये रॅगींग करणे कायद्याने गुन्हा आहे. असे रॅगींग, गैरकृत्य, गैरवर्तन करणाऱ्या किंवा त्यास प्रोत्साहन देणाऱ्या विद्यार्थ्यांविरुद्ध विद्यापीठ कायदा कलम ८७ (८) तसेच महाराष्ट्र प्रोव्हिजन ऑफ ॲक्ट १९९६, ३३/९९ प्रमाणे फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल. त्याचा महाविद्यालयातील प्रवेश रद्द करण्यात येईल. तसेच शिष्यवृत्ती स्थगित केली जाईल वा रु.१०,०००/- दंड वा दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

## : शिष्यवृत्तीसाठी शर्ती व अटी :

शिष्यवृत्तीधारक उमेदवारांनी शिष्यवृत्ती अर्ज भरतांना जोडावयाची आवश्यक कागदपत्रे व माहितीचे विवरण पुढीलप्रमाणे -

१) शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म परिपूर्ण बिनचूक व व्यवस्थित भरणे तसेच हमीपत्र सादर करणे आवश्यक.

२) विद्यार्थ्यांचे राष्ट्रीयकृत बँकेचे बचत खाते पासबुक व आधारकार्ड लिंकींगसह आवश्यक- २ सत्यप्रतींसह

३) उत्पन्नाचा मुळ दाखला-सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांनी (S.T., S.C., S.B.C., N.T., O.B.C.) पालकांच्या वार्षिक उत्पन्नाचा दाखला मुळप्रत जोडणे आवश्यक-२ झेरॉक्स प्रतींसह.

४) वडिल नसल्यास मृत्यूचा दाखला व पालकांच्या मुळ उत्पन्नाचादाखला जोडणे. २ झेरॉक्स प्रतींसह

५) जातीचा दाखला- २ झेरॉक्स प्रतींसह आवश्यक (दाखल्यावर खाडाखोड नसावी)

६) मागील वर्षाचे उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक - २ झेरॉक्स प्रतींसह आवश्यक

७) आधारकार्ड - २ प्रती झेरॉक्स आवश्यक (बँक खात्यासह आधारकार्ड लिंकींग करावे)

८) अधिवास प्रमाणपत्र (Domicile), नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Criminal) आवश्यक (S.B.C., N.T., O.B.C.साठी) - २ झेरॉक्स प्रतींसह

९) शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत शिष्यवृत्ती अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयात जमा करावे.

सूचना :१) शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची ८०% हजेरी आवश्यक राहील. अन्यथा अशा विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती नामंजूर झाल्यास अथवा काही आवश्यक कागदपत्रांसाठी/त्रुटी आढळल्यास विद्यार्थी स्वतः जबाबदार राहील. महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. २) शिष्यवृत्ती अर्ज न भरल्यास अशा विद्यार्थ्यांस महाविद्यालयाचे आवश्यक ते शुल्क (फी) भरावे लागेल. ३)EBC विद्यार्थ्यांसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा १ लाखापर्यंत आहे.

## : महाविद्यालयातील कला शाखा अभ्यासक्रम :

**कला विद्या शाखा :**

**अ) प्रथम वर्ष कला (F.Y.B.A.)**

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार एफ.वाय.बी.ए.च्या विद्यार्थ्यांना एकूण ७ विषय अभ्यासावे लागतील.

१) इंग्रजी (अनिवार्य) २) मराठी ३) हिंदी ४) अर्थशास्त्र
५) इतिहास ६) भूगोल ७) पर्यावरणशास्त्र अनिवार्य

- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव यांच्या आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून FYBA साठी ६0:४0 पॅटर्न लागू करण्यात आलेला असून दोन सत्रांत होणाऱ्या परीक्षांमध्ये ६0 गुणांची लेखी परीक्षा व ४ गुणांची अंतर्गत परीक्षा होईल.
- FYBA साठी पर्यावरणशास्त्र हा विषय द्वितीय सत्रासाठी अनिवार्य आहे. त्या विषयाची परीक्षा द्वितीय सत्रातच होईल.
- FYBA वर्गाच्या दोन्ही सत्रांत अंतर्गत व बहिस्थ परीक्षेत कमाल २-२ (४) विषयात अनुत्तीर्ण विद्यार्थी द्वितीय वर्षात (SYBA) A.T.K.T. प्रवेश घेण्यास पात्र राहतील.
- तृतीय वर्षाच्या प्रवेशासाठी प्रथम वर्षाची परीक्षा सर्व विषयांत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**ब) द्वितीय वर्ष कला (S.Y.B.A.)**

प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना सामान्य (General) आणि विशेष (Special) विषयाच्या एका अभ्यासक्रमाची निवड करावी लागते. सामान्य (General) व विशेष (Special) विषय पुढीलप्रमाणे-

१) इंग्रजी (अनिवार्य) २) मराठी विशेष - १ व २, मराठी जनरल

३) हिंदी विशेष - १ व २, हिंदी जनरल ४) इतिहास विशेष - १ व २, इतिहास जनरल

५) अर्थशास्त्र जनरल ६) भूगोल जनरल ७) सामान्यज्ञान (अनिवार्य)

- SYBA साठी सामान्यज्ञान विषय अनिवार्य असून सामान्यज्ञान विषयाची परीक्षा चतुर्थ सत्रात होईल.
- विद्यार्थ्यांना मराठी, हिंदी, इतिहास या विषयांपैकी एका विषयाची निवड विशेष विषय (Special Subject) म्हणून करावी लागेल. विशेष विषयाचे १ व २ तसेच जनरल पेपर्स अभ्यासावे लागतील.

**क) तृतीय वर्ष कला (S.Y.B.A.)**

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार बी.ए.च्या तृतीय वर्षात पुढील सहा विषयांचा अभ्यास करावा लागेल.

१) इंग्रजी (अनिवार्य) २) अर्थशास्त्र (जनरल) ३) भूगोल (जनरल)

४) द्वितीय वर्ष कला वर्गात अभ्यासक्रमासाठी निवडलेल्या विशेष विषयाचे २ व १ जनरल पेपर्स

i) S3 विशेष (मराठी, हिंदी, इतिहास)

ii) S4 विशेष (मराठी, हिंदी, इतिहास)

iii) जनरल (मराठी, हिंदी, इतिहास)

**परीक्षेसंबंधी आवश्यक सूचना :**

१) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नियमानुसार प्रथम वर्ष कला, द्वितीय वर्ष कला व तृतीय वर्ष कला वर्गांसाठी प्रत्येक सत्रात सर्व विषयांसाठी महाविद्यालयाकडून अंतर्गत गुणांसाठी लेखी परीक्षा घेतली जाते. या परीक्षा विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहेत.

६०:४० (पॅटर्न २०१६-१७ पासुन लागु) अंतर्गत गुणांची ४० अंक व विद्यापीठाची ६० गुणांची लेखी परीक्षा प्रत्येक सत्रात व ४०:१० (पॅटर्नसाठी) अंतर्गत गुणांची १० अंक व विद्यापीठाची ४० गुणांची लेखी परीक्षा प्रत्येक सत्रासाठी.

२) विद्यार्थ्यांसाठी वरील परीक्षा सक्तीच्या असल्याने या परीक्षा देणे विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहे.

३) विद्यार्थ्यांसाठी सत्रांत परीक्षांची उपस्थिती आवश्यक आहे.

४) विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती ८०% आवश्यक आहे. उपस्थिती कमी असल्यास परीक्षा फॉर्म भरता येणार नाही.

५) प्रवेश अर्जात जे विषय घेतलेले असतील त्याच विषयांची परीक्षा देता येईल.

६) विद्यार्थ्यांनी विहीत मुदतीत परीक्षा अर्ज व शुल्क (फी) भरणे आवश्यक राहील. अन्यथा

परीक्षा देता येणार नाही. त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

७) महाविद्यालयाकडून परीक्षेसंबंधी वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

## : विशेष शुल्क सुचना :

**पर्यावरण शुल्क :**

प्रथम वर्ष कला वर्गासाठी पर्यावरणशास्त्र हा विषय सक्तीचा असून त्या करीता विद्यार्थ्यांकडून प्रति विद्यार्थी रु.१००/- शुल्क (परीक्षा शुल्क) विद्यापीठाच्या निर्देशानुसार आकारण्यात येईल.

**पात्रता शुल्क :**

प्रथम वर्ष कला वर्गासाठी पात्रता प्रमाणपत्र शुल्क म्हणून प्रति विद्यार्थी (५०/६०) विद्यापीठाच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येईल.

ओळखपत्र शुल्क (फी) रु.२५/- विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येईल.

**सामान्यज्ञान :**

द्वितीय वर्ष कला वर्गासाठी सामान्यज्ञान हा विषय सक्तीचा असून त्याकरीता विद्यार्थ्यांकडून रु.५०/- शुल्क आकारण्यात येईल.


**सुचना :** विद्यार्थ्यांना प्रवेश फी किंवा अन्य बाबतीत काही अडचणी/तक्रारी असल्यास महाविद्यालयाच्या कार्यालयात समक्ष भेटावे.

---

## : मतदानाचा हक्क भारतीय लोकशाहीचा आधार :

### मतदान श्रेष्ठदान

### भारतीय संविधान



मतदान प्रत्येक नागरीकाचा हक्क व कर्तव्य !

केंद्रीय निर्वाचन आयोगाच्या निर्देशानुसार व राज्य निर्वाचन आयोगाच्या आदेशान्वये १८ वर्षावरील वयोगटातील म्हणजेच वरीष्ठ महाविद्यालयात प्रविष्ठ सर्वच विद्यार्थी-विद्यार्थिनींना स्वतःची मतदार नोंदणी करुन घेणे, प्रवेश अर्जात स्वतःच्या मतदार क्रमांक नोंदविणे अनिवार्य आहे. Election Commision of India च्या www.eci.nic.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध आहे. आपल्या महाविद्यालयात देखील विद्यार्थ्यांना मतदान नोंदणी करता येईल.

Shri Saibaba Bhakt Mandal's

# ART'S SENIOR COLLEGE, MHASAWAD

## Tal. Shahada, Dist. Nandurbar

As per North Maharashtra University Circular No.124/2008 Fee structure
Statement showing minimum fees for paying students at the time of admission

| Sr. No | Particulars | F.Y.B.A. | | | S.Y.B.A. | | | T.Y.B.A. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | B.C. O.B.C. | E.B.C. P.T.C. F.F. | Pay-ing | B.C. O.B.C. | E.B.C. P.T.C. F.F. | Pay-ing | B.C. O.B.C. | E.B.C. P.T.C. F.F. | Pay-ing |
| 1. | Eligibility Fee | 60 | 60 | 60 | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 2. | Tutorial & Internal Exam.Fee | -- | 60 | 60 | -- | 60 | 60 | -- | 60 | 60 |
| 3. | Library Fee | -- | 115 | 125 | -- | 115 | 125 | -- | 115 | 125 |
| 4. | Gymkhana Fee | 100 | 80 | 100 | 100 | 80 | 100 | 100 | 80 | 100 |
| 5. | Ashwamegh Fee | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 6. | Medical Fee | 25 | 25 | 25 | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 7. | Student Group Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 8. | Admission Fee | -- | 10 | 25 | -- | 10 | 25 | -- | 10 | 25 |
| 9. | Tuition Fee | -- | -- | 800 | -- | -- | 800 | -- | -- | 800 |
| 10. | Student Activities Fee | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| 11. | Identity Card Fee | -- | 10 | 10 | -- | 10 | 10 | -- | 10 | 10 |
| 12. | College Development Fund | -- | 75 | 75 | -- | 75 | 75 | -- | 75 | 75 |
| 13. | Comuterization Fee | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 14. | Laboratory Fee | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 15. | General Knowledge Fee | -- | 50 | 50 | -- | 50 | 50 | -- | -- | -- |
| 16. | Poor Student Aid Fund | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| 17. | Apatkalin Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 18. | Magazine Fee | -- | 40 | 40 | -- | 40 | 40 | -- | 40 | 40 |
| 19. | Gathering Fee | -- | 40 | 40 | -- | 40 | 40 | -- | 40 | 40 |
| 20. | Environmental Studies | -- | 100 | 100 | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 21. | Personality Development & Career Guidance Fee | -- | 25 | 25 | -- | 25 | 25 | -- | 25 | 25 |
| 22. | Alumni Association Fee | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | 25 | 25 |
| 23. | MKCL Fee | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 24. | Miscellaneous Fee | -- | 100 | 100 | -- | 100 | 100 | -- | 100 | 100 |
| | **TOTAL FEES** | **385** | **990** | **1835** | **300** | **875** | **1650** | **375** | **780** | **1625** |

# ई-सुविधा माझी सुविधा, ईझी सुविधा!


उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव



विद्यार्थी मित्रहो,
कॉलेजच्या सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत अनेक कार्यालयीन कामाशी तुमचा संबंध येतो. ज्यामध्ये ॲडमिशनचे फॉर्म्स, एलिजिबिलिटी फॉर्म्स, टाइम-टेबल, हॉल-तिकीट, डिग्री सर्टिफिकेटस अशा अनेक गोष्टी वारंवार कॉलेज अथवा युनिव्हर्सिटीमध्ये जाऊन कराव्या लागतात. या कामांसाठी विद्यार्थी व कॉलेजला लागणारा वेळ, पैसा आणि परिश्रम यांची बचत करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना वैयक्तिक सुविधा घरबसल्या कमी वेळेत पोहचविण्यासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठा तर्फे ''ई-सुविधा'' हा उपक्रम एमकेसीएलच्या सहकार्याने सुरु करण्यात आला आहे. या ''ई-सुविधा'' उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी खालील पद्धतीने सहभागी व्हा.

आपला १६ अंकी पीआरएन (PRN) / DUPin कॉलेजमधून मिळवा.
इंटरनेटचा वापर करुन http://nmuj.digitaluniversity.ac
या साइटवर आपले ''ई-सुविधा'' अकाउंट ॲक्टिव्हेट करा.

आणि कॉलेज-युनिव्हर्सिटीच्या कागदपत्रांचे
सर्व व्यवहार करा आता एका क्लिकवर !



| अनु.क्र. | सुविधा | फायदे |
|---|---|---|
| १ | कॉलेज मध्ये नोंदविलेल्या नावातील स्पेलिंगच्या चुका सुधारण्यासाठी विनंती करा व त्याचे स्टेटस जाणून घ्या. | बदल करण्यासाठी कुठल्याही (फीजीकल) फॉर्म भरण्याची किंवा विद्यापीठात जाण्याची आवश्यकता नाही. |
| २ | तुमचा मोबाईल नंबर व वैयक्तीक माहिती अपडेट करा. | विद्यापीठातून निकाल, परीक्षेचे वेळापत्रक, असे SMS अलर्ट मिळवा. |
| ३ | निवडलेल्या विषयांचा अभ्यासक्रम (Syllabus) डाउनलोड करा. | योग्य अभ्यासक्रम योग्य वेळेत मिळवा. |
| ४ | जुन्या प्रश्नपत्रिका डाउनलोड करा | प्रश्न पत्रिका सोडवा व आत्मविश्वास वाढवा. |
| ५ | तुमचे इलिजिबिलिटी (पात्रता) स्टेटस तपासा. | विद्यापीठास नेमके कोणते कागदपत्र हवे आहेत, त्याची माहिती मिळवा. |
| ६ | परीक्षेसंबंधी तारखांबद्दल माहिती मिळवा. | आता परीक्षा फॉर्म भरताना लेट फी किंवा फॉर्मची तारीख चुकण्याची काळजी करु नका. |
| ७ | तुमच्या विषयांचे पूर्व नियोजन करण्यासाठी परीक्षेचे व्यक्तिगत वेळापत्रक डाउनलोड करा. | आता लांबलचक यादीतून वेळापत्रक उतरवून घेण्यासाठी नोटीस बोर्डजवळ गर्दी करायला नको. |
| ८ | सिस्टिम जनरेटेड प्री-फिल्ड एक्झाम फॉर्म्स | अर्ज घेण्याकरिता ताटकळत राहण्याची, किंवा हाताने भरण्याची गरज नाही. अर्जावर सही करुन कॉलेजमध्ये फी भरा. |
| ९ | व्यक्तिगत परीक्षा प्रवेश पत्र (Hall Ticket) मिळवा. | प्रत्येक पेपरची तारीख, परीक्षा केंद्राचा पत्ता व वेळ जाणून घ्या. |
| १० | पुर्न: मुल्यांकन (Revaluation) या किंवा पुर्न: परीक्षेचा अर्ज मिळवा. | या करता विद्यापीठात जाण्याची आवश्यकता नाही. |
| ११ | ईझी - EASY (Employment Assistance Services to Youth)- शिष्यवृत्ती योजना. | शंभरावर शिष्यवृत्ती योजनांपैकी तुम्हाला सर्वाधिक सोयीच्या असलेल्या शिष्यवृत्ती निवडा आणि अर्ज करा. |
| १२ | ईझी - व्यावसायिक व शैक्षणिक अभ्यासक्रम व प्रमाणपत्रांची माहिती. | एकाच ठिकाणी सर्व माहिती उपलब्ध. |
| १३ | ईझी - कमवा आणि शिका. | सुटीच्या दिवसांत कामाच्या अनुभवासह पॉकेट मनी कमविण्याची संधी, तीही तुमच्याच शहरात. |
| १४ | ईझी - नोकरीचा शोध. | हजारो नोकऱ्यांच्या पर्यायांतून तुमच्या शिक्षणाला साजेशी नोकरी शोधा. |
| १५ | ईझी - दिनदर्शिका. | देशभरात होणाऱ्या जॉब फेअर्सना हजेरी लावा. |
| १६ | ईझी - स्पर्धा परीक्षा. | विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी सुयोग्य मार्गदर्शन मिळवा. |
| १७ | बँकेत खाते उघडणे, ड्रायव्हिंग लायसेन्स काढणे, पासपोर्ट काढणे इ. साठीच्या वेब साईटच्या लिंक्स. | भारताचे जागरुक व स्वयं प्रेरित नागरिक व्हा. |
| १८ | ब्लॉग्ज. | मित्रांबरोबर शेअर करा. |
| १९ | आणि इतरही बरेच काही... | तुमचे लॉग इन ॲक्टिव्हेट करण्यासाठी **http://nmuj.digitaluniversity.ac** या वेब साईटला आजच भेट द्या आणि ई-सुविधा सोबत ईझी सुविधा मिळवा, सर्वांच्या पुढे रहा ! |




MKCL's Digital University®
Empower Students Digitally!


अधिक माहितीसाठी संपर्क
ई-सुविधा - विद्यार्थी सहाय्यता केंद्र (SFC)
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
☎: ०२५७-२२५८४१८
E-mail:- sfc@nmuj.digitaluniversity.ac

For more Information Contact to
e-Suvidha - Student Facilitation Center (SFC)
North Maharashtra University, Jalgaon
☎: 0257-2258418
E-mail:- sfc@nmuj.digitaluniversity.ac

# विद्यार्थ्यांसाठी विविध योजना

## कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना

कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका ही पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहे, तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, होतकरू व गरजू विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी ही योजना आहे. या योजनेचा उद्देश स्वावलंबनाने विद्यार्थ्याला श्रमाची आवड निर्माण करणे, श्रमाची प्रतिष्ठा वाढविणे.स्वयंरोजगारासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे आदि मुख्य उद्देश योजनेचे आहेत. योजनेत विद्यार्थ्याने अध्ययनाच्या वेळेव्यतिरिक्त किमान तीन तास काम करणे अपेक्षीत आहे. या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना आर्थिक लाभ मिळतो.

## साहस कार्यशाळा :-

विद्यार्थ्यांना साहसीवृत्ती निर्माण होणेविषयी या कार्यशाळेत प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाते. संकटाना धैर्याने सामोरे जाणे मार्ग काढणे, मदत करणे, गिर्यारोहण, रोपवे, पुल बांधणी, रस्ता दुरुस्ती, दिशा ओळख, आकाश निरीक्षण, आत्मसंरक्षण व प्रतीकार आणि निसर्ग सहल असे विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. प्रत्येक महाविद्यालयातील १ विद्यार्थी व १विद्यार्थिनी या कार्यशाळेत सहभागी होवू शकतात.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह विद्यार्थी सहाय्यता योजना

विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळा अथवा विभागांमध्ये पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियमित प्रवेशित व विद्यापीठाच्या वसतिगृहात निवासित विद्यार्थ्यांपैकी जे आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिकसहाय्य उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह विद्यार्थी सहाय्यता योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

## उमवि संचलित चाणक्य स्पर्धा परीक्षा :-

विद्यार्थ्यांमधील स्पर्धा परीक्षा कौशल्य वृध्दिंगत करणेसाठी व पूर्वतयारीसाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ स्तरावर चाणक्य स्पर्धा परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येते. प्रत्येक महाविद्यालय हे परीक्षा केंद्र आहे. ५० पेक्षा जास्त परीक्षार्थी असलेल्या महाविद्यालयांना पूर्वतयारीसाठी स्पर्धा परीक्षा पुस्तकांसाठी अनुदान देण्यात येते. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देण्यात येतील. स्थानिक महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण अधिकारी हे या उपक्रमाचे प्रमुख असतील. तलाठी. पी.एस.आय., तहसीलदार या पदांसाठीच्या स्पर्धा परीक्षेची तयारी या उपक्रमाद्वारे होईल. सदर परीक्षेत महाविद्यालयातील कितीही विद्यार्थी सहभागी होवू शकतात.

## उमवि विद्यार्थी दत्तक योजना :-

विद्यापीठ विभागातील विविध प्रशाळा व शैक्षणिक विभाग यातील शिक्षण घेणाऱ्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ पासून उमवि विद्यार्थी दत्तक योजना सुरु करण्यात आली आहे. त्यासाठी १० विद्यार्थी व १० विद्यार्थिनी यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो.

## विद्यार्थी संशोधन योजना :-

संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी, संशोधक विद्यार्थी आर्थिक अडचणींमुळे मागे राहू नये या साठी संशोधक विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाद्वारे भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठाचे विभाग व संलग्नीत महाविद्यालये यांचेसाठी संशोधन विकास योजना आहे. विद्यार्थी कल्याण विभाग अंतर्गत विद्यार्थी संशोधन प्रोत्साहन योजना, मा. कुलगुरु प्रायोजित विशेष संशोधन योजना विज्ञान व तंत्रज्ञान विषयात विशेष कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यास जी. एच. रायसोनी यांचे सौजन्याने तीन संशोधक विद्यार्थ्यांना रु. ७,०००/- ते रु. १०,०००/- पर्यंत प्रतिमाह संशोधन शिष्यवृत्ती दिली जाते.

## सांस्कृतिक गुण कार्यशाळा आयोजन :-

विद्यार्थ्यांना गायन, वादन, नृत्य, नाट्य, सुत्रसंचलन कार्यशाळा या क्षेत्रातील नव्या संकल्पना, तंत्रज्ञान अवगत व्हावे त्यांची सांस्कृतिक क्षेत्रातील प्रगती व्हावी यासाठी कार्यशाळांचे आयोजन विद्यापीठ स्तरावर विद्यार्थी कल्याण विभाग करते.

## युवती सभा कार्यशाळा :-

विद्यार्थी कल्याण विभागामार्फत नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींकरीता महाविद्यालयीन स्तरावर विशेष स्वरुपाच्या उपक्रमांचे आयोजन करणेकरीता युवती सभा अंतर्गत स्वंयसिध्दा - अभियान व विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा आयोजित करण्यात येते. प्रत्येक कार्यशाळेत महाविद्यालयातील ५० विद्यार्थिनी सहभागी होवू शकतात.

## एकलव्य विद्याधन कर्ज योजना :-

एकलव्य विद्याधन कर्ज योजना ही पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहे. योजनेत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी येणाऱ्या खर्चाच्या ८० टक्के रक्कम कर्ज स्वरुपात आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर बँकेद्वारे उपलब्ध होते. शिक्षण कर्जासाठी व्याजाचा दर द.सा.द.शे. ११ टक्के असेल. शिक्षण कालावधीमधील खर्चाच्या व्याजाची रक्कम विद्यापीठ कार्यालयाद्वारे अदा केली जाते. ज्या विद्यार्थ्यास प्रवेशित काळात शासकीय/ निमशासकीय/सहाकारी संस्था/बँका यांच्या कडून कोणतेही विद्यावेतन/ शिष्यवृत्ती मिळत नसेल, असाच विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र राहील.

## मा. कुलगुरु वैद्यकीय निधी योजना :-

विद्यार्थी सामुहिक सुरक्षा योजने शिवाय अपघाती/नैसर्गिक मृत्यु झाल्यास रु. ५,०००/- मृत विद्यार्थ्यांच्या पालकास मा.कुलगुरु वैद्यकीय निधीतुन देण्यात येतील. प्रवेशीत विद्यार्थ्यास एखादा गंभीर आजार, अपघाताने जखमी झाल्यास उपचारासाठी योग्य त्या कागदपत्रांची खातरजमा करुन सहाय्य करण्यात येते.

टिप: विद्यापीठ निधी आणि मा. कुलगुरु निधीतून राबविल्या जाणाऱ्या विद्यार्थी कल्याणकारी योजनांची अधिक माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर मराठी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध आहे.


## उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

संपर्क :- विद्यार्थी कल्याण विभाग, उ.म.वि., जळगाव, ०२५७-२२५७४१८,४१९

Grade - B (2.88)
NAAC Re-Accredited

• अधिक माहिती साठी संपर्क :-आपल्या महाविद्यालयातील प्राचार्य व विद्यार्थी कल्याण अधिकारी



# श्री साईबाबा भक्त मंडळ, म्हसावद,

## ता. शहादा, जि. नंदुरबार

### :: संस्थेच्या विविध विद्या शाखा ::

१) श्री साईबाबा बाल मंदिर, म्हसावद

२) प.पू.संतश्री आसारामजी बापू प्राथमिक शाळा, म्हसावद

३) प.पू.सती गोदावरी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, म्हसावद

४) श्री साईबाबा भक्त मंडळ संचलित अध्यापक विद्यालय, म्हसावद

५) श्री साईबाबा भक्त मंडळ संचलित, कला वरिष्ठ महाविद्यालय, म्हसावद

### :: प्राध्यापक वृंद ::

१) प्रा. एम. आर. पाटील (प्र.प्राचार्य) — मो.नं. ९५०३२३७३०९
M.A., B.Ed., NET-SET (Hindi)

२) प्रा. श्रीमती एस. एस. पटेल — मो.नं. ७७९८५१२२१८
M.A., M.Phil., SET (English)

३) प्रा. एस. यु. बनसोडे — मो.नं. ९१५८१३९८५२
M.A., M.Phil., SET (Economics)

४) प्रा. ए. बी. गिरासे — मो.नं. ८२७५७२७५९६
M.A., B.Ed., NET (Marathi)

५) श्री. हेमराज जे. पाटील (क्लार्क) — मो.नं. ९९२१०३४३७८
B.Sc. (Comp.), GDC & A

सिग्मा COMPUTERS SHD.9850242571